
संत चोखामेळा अभंगगाथा

# संत चोखामेळा
# अभंगगाथा

**संत चोखामेळा अभंगगाथा**
SANT CHOKHAMELA ABHANGGATHA

**प्रकाशक**
सप्तर्षी प्रकाशन
गट न.८४/२, दामाजी कॉलेजच्या पाठीमागे, मंगळवेढा
जि.सोलापूर-४१३३०५
**प्रथमावृत्ती: १७ जुलै २०१४**

**मुखपृष्ठ:**
सप्तर्षी डी.टी.पी.

**मुद्रक:**
**किशोर तु.घुले**
सप्तर्षी डी.टी.पी.
मंगळवेढा

**मूल्य:** मोफत

।१।

देही देखिली पंढरी । विठू अविनाश विठेवरी ।। १ ।।

रूक्मिणी अंगना । आत्मा पुंडलीक जाणा ।। २ ।।

आकार तितका नासे । निराकार विठ्ठल दिसे ।। ३ ।।

ऐसे गुज ठायींचें ठायीं । चोखा ह्मणे लागा पायीं ।। ४ ।।

।२।

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ।।१।।

पंढरीचा हाट कऊलांची पेठ । मिळाले चतुष्ट वारकरी ।।२।।

पताकांचे भार मिळाले अपार । होतो जयजयकार भीमातिरी ।।३।।

हरिनाम गर्जता भय नाही चित्ता । ऐसे बोले गीता भागवत ।।४।।

खटनट यावे शुद्ध होऊनी जावे । दवंडी पिटी भावे चोखामेळा ।।५।।

।३।

कोणें देखियेलें जगा । पांडुरंगा मी नेणें ।। १।।

मौन्य पारुशली वाणी । शब्द खाणी विसरली ।। २।।

एका आधीं कैचें दोन । मजपासुन मी नेणें ।। ३।।

मुळींच चोखा मूळ नाहीं । कैंची विठ्ठल राही ।। ४।।

।४।

पांडुरंगा लागो मन । कोण चिंतन करी ऐसें ।। १।।

देह भाव विसरला। देव गेला बुडोनी ।। २।।

जीव उपाधि भक्ति वंद्य । तेथें भेद जन्मला ।। ३।।

चोखामेळा संत । हेही मात उपाधी ।। ४।।

।५।

ऊंस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिये रंगा ।।१।।

कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलिये रंगा ।।२।।

नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगे । काय भुललासी वरलिये रंगे ।।३।।

चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिये रंगा ।।४।।

।६।

विठोबा पाहुणा आला अमुच्या घरा । निंबलोण करा जीवे भावे ।।

षड्रस पक्वान्न विस्तारिले ताट । जेवू एकवट चोखा म्हणे ।।

पुढे ठेवोनिया पान । वाढी कुटुंबी ते अन्न।।

तुम्हा योग्य नव्हे देवा । गोड करुनिया जेवा ।।

द्रौपदीच्या भाजीपाना । तृप्ती झाली नारायणा ।।

तैसी झाली येथे परी । म्हणे चोखीयाची म्हारी ।।

।७।

भाव समुद्रीं भरियेलें केणें । आणियलें नाणें द्वारकेचें ।।१।।

बाराही  मार्गीची वणिकरी । पंढर हे पुरी नामदेव ।। २।।

चोखा ह्मणे लोटांगणी जाऊं । नामदेव पाहूं केशवाचा ।। ३।।

।८।

धांव घाली विठू आतां चालूं नको मंद ।

बडवे मज मारीती ऐसा कांही तरी अपराध ।। १।।

विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला ।

शिव्या देती ह्मणती महारा देव बाटविला ।। २।।

अहोजी महाराज तुमचे द्वारींचा कुतरा ।

नकाजी मोकलूं चक्रपाणी दुणेदारा ।। ३।।

जोडूनिया कर चोखा बिनवितो देवा ।

बोलिला उत्तरी परी राग नसावा ।। ४।।

।९।

जोहार माय बाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ।।१।।

बहु भुकेला झालो । तुमच्या उष्ट्यासाठी आलो ।।२।।

बहु केली आस । तुमच्या दासाचा मी दास ।।३।।

चोखा म्हणे पाटी । आणिली तुमच्या उष्ट्यासाठी ।।४।।

।१०।

हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।।१।।

मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रीती ।।२।।

माझा लागताची कर । सिंतोडा घेती करार ।।३।।

माझ्या गोविंदा गोपाळा । करुणा भाकी चोखामेळा ।।४।।

**।११।**

भेदाभेद कर्म न कळे त्याचे वर्म । वाऊगाचि श्रम वाहता जगी ।।१।।

नामापरता मंत्र नाही त्रिभुवनी । पाप ताप नयनी न पडेची ।।२।।

वेदाचा अनुभव शास्त्राचा अनुवाद । नामचि गोविंद एक पुरे ।।३।।

चोखा म्हणे मज काहीच न कळे । विठ्ठलाचे बळे नाम घेतो ।।४।।

**।१२।**

त्रैलोक्य वैभव ओवाळोनि सांडावे ।नाम सुखे घ्यावे विठोबाचे ।।१।।

आणिक साधने आहेत बहुता परी ।नामाची ती सरी न पवती ।।२।।

म्हणोनि सुलभ विठ्ठल एक नाम ।गाता नाचता प्रेमे मुक्ती तया ।।३।।

चोखा म्हणे माझा अनुभव उघडा ।भव भय पीडा येणे वारे ।।४।।

**।१३।**

आम्हा न कळे ज्ञान न कळे पुराण । वेदांचे वचन न कळे आम्हा ।।१।।

आगमाची आठी निगमाचा भेद । शास्त्रांचा संवाद न कळे आम्हा ।।२।।

योग याग तप अष्टांग साधन । न कळेचि तप दान व्रत ।।३।।

चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा । गाईन केशवा नाम तुझे ।।४।।

।१४।

बहुमत ग्रंथ करिता पठण । सुख समाधान नव्हे तेणे ।।१।।

वेदशास्त्र पुराण करिता श्रवण । सुख समाधान नव्हे तेणे ।।२।।

अष्टांग साधन करिता जप यज्ञ । सुख समाधान नव्हे तेणे ।।३।।

उपवास पारणे आणि धूम्रपान । सुख समाधान नव्हे तेणे ।।४।।

चोखा म्हणे सुख समाधान वृत्ती । पाहता विठ्ठलमूर्ति विटेवरी ।।५।।

।१५।

योग याग व्रत तप आणि दान । करिता साधन नाना कष्ट ।।१।।

सुलभ सोपे रे नाम विठोबाचे । सकळ साधनांचे मूळ बीज ।।२।।

येणे भवव्यथा तुटेल जीवाची । प्रतिज्ञा संतांची हीच असे ।।३।।

म्हणोनि नामाचा करा गदारोळ । म्हणे चोखामेळा विठ्ठल वाचे ।।४।।

।१६।

कासया करु तपाचे डोंगर । आणिक अपार व्रत दान ।।१।।

कासया जाऊ दूर दिगंतरी । राहीन पंढरी पशु याती ।।२।।

कासया उपवास निराहार पारणे । संत संगपणे जन्मोजन्मी ।।३।।

कासया विधि निषेधाची मात । सुखाचा सांगात तुमचा माझा ।।४।।

कासया भ्रमण देश तीर्थाटणी । सेवीन पायवणी संताघरी ।।५।।

कासया करावे पंचाग्नीसाधन । उच्छिष्ट भक्षीण संताघरी ।।६।।

चोखा म्हणे सुख येईल घरासी । जाईन संतांशी शरण देवा ।।७।।

।१७।

बहुत कनवाळू बहू हा दयाळू । जाणे लळा पाळू भाविकांचा ।।१।।

जात वित्त गोत न पाहेचि काही । घालावी ही पायी मिठी उगी ।।२।।

न मागता आभारी आपेआप होतो । भाविकासी देतो भुक्तिमुक्ति ।।३।।

चोखा म्हणे ऐसा लाघवी श्रीहरी । भवभय वारी दरुशने ।।४।।

।१८।

उदंड शहाणे होवोत तार्किक । परी न कळे अलौकिक महिमा कांही ।।१।।

उदंड वाचन जरी झाले साचे । परी महिमान ययाचे न कळे कांही ।।२।।

उदंड ब्रह्मज्ञान सांगताती गोष्टी । परी अनुभव कसवटी एक नाही ।।३।।

संतांचे उदंड घेताती सोंग । कामनेचा त्याग करिता न ये ।।४।।

उदंड वैराग्य दाखविती जन । परि वासना भोग त्याग त्यागीता न ये ।।५।।

कीर्तनी सांगती अनुभव गोष्टी । परि धन कांता दृष्टी त्याग नव्हे ।।६।।

चोखा म्हणे हे तो पोटाचे बांधले । म्हणोनि पांगिले घरोघरी ।।७।।

**।१९।**

माकडाचे परी हालविती मान । दावी थोरपण जगामध्ये ।।१।।

स्वहिता मुकले स्वहिता मुकले । बळे झाकी डोळे नाक धरी ।।२।।

माळा आणि मुद्रा दाविताती सोंग । डोलविती अंग रंग नाही ।।३।।

पोटाचा पोसणा विटंबना करी । भीक दारोदारी मागतसे ।।४।।

चोखा म्हणे जगामध्ये भोंदू । तया कोण साधू म्हणे देवा ।।५।।

**।२०।**

कर्माते वाळिले धर्माते वाळिले । सर्व हारपले जेथीचे तेथे ।।१।।

विधीते वाळिले निषेधा गिळीले । सर्व हारपले जेथीचे तेथे ।।२।।

वेदाते वाळिले शास्त्राते वाळिले । सर्व हारपले जेथीचे तेथे ।।३।।

चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देहीच भेटला देव आम्हा ।।४।।

**।२१।**

श्वान अथवा शूकर हो का मार्जार । परि वैष्णवाचे घर देई देवा ।।१।।

तेणे समाधान होय माझ्या जीवा । न भाकी कीव आणिकासी ।।२।।

उच्छिष्ट प्रसाद सेवीन धणीवरी । लोळेन परवरी कवतुके ।।३।।

चोखा म्हणे कोणी जाता पंढरीसी । दंडवत त्यासी घालीन सुखे ।।४।।

।२२।

न लगे भुक्ति मुक्ति वैकुंठिचा वास । सुखे पंढरीस राहीन देवा ।।१।।

आणिक साकडे पडोत नानापरी । परी मी पंढरी सोडोनि न वजे कोठे ।।२।।

खावयासी जरी न मिळे चि अन्न । उदक सवान धणीवरी ।।३।।

कोणी निंदो कोणी म्हणोत का वेडा । जेणे नव्हे पीडा भजनासी ।।४।।

चोखा म्हणे मज आहे हेच सुख । आणिके ठायी दु:ख नाना परी ।।५।।

**।२३।**

आता कोठवरी । भीड तुमची धरु हरी ।

दार राखीत बैसलो । तुम्ही दिसे मोकलीलो ।

ही नित नव्हे बरी । तुमची साजे तुम्हा थोरी ।

चोखा म्हणे काय बोलो । आमुचे आम्ही वाया गेलो ।

।२४।

योग याग तप,व्रत आणि दान । करिता साधन नाना कष्ट ।।१।।

सुलभ सोपे रे नाम विठोबाचे । सकळ साधनांचे मूळ बीज ।।२।।

येणे भव व्यथा तुटेल जीवाची । प्रतिज्ञा संतांची हीच असे ।।३।।

म्हणोनि नामाचा करा गदारोळ । म्हणे चोखामेळा विठ्ठल वाचे।।४।।

**।२५।**

जगामध्ये दिसे बरे की वाईट । ऐसाचि बोभाट करीन देवा ।।१।।

आता कोठवरी धरावी हे भीड । तुम्ही तो उघड जाणतसा ।।२।।

ब्रीदाचा तोडर बांधिलासे पायी । त्रिभुवनी ग्वाही तुमची आहे ।।३।।

चोखा म्हणे जेणे न ये उणेपण । तेचि ते कारण जाणा देवा ।।४।।

**।२६।**

शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा ।।१।।

मी यातीहीन महार । पूर्वी निळाचा अवतार ।।२।।

कृष्ण निंदा घडली होती । म्हणोनी महार जन्मप्राप्ती ।।३।।

चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्वीचे हे फळ ।।४।।

**।२७।**

नाही देह शुद्ध याती अमंगळ । अवघे वागळ गुण दोष ।।१।।

करु जाता विचार अवघा अनाचार । आणिक प्रकार काय बोलू ।।२।।

वाणी नाही शुद्ध धड न ये वचन । धि:कारिती जन सर्व मज ।।३।।

अंग संग कोणी जवळ न बैसे । चोखा म्हणे ऐसे जीवित माझे ।।४।।

।२८।

कळेल तैसे तुजचि बोलेन । भीड मी न धरीन तुझी काही ।।१।।

काय करु देवा दाटलो जाचणी । न या चक्रपाणी सोडवण्या ।।२।।

कोठवरी धावा फोकारु केशवा । माझा तव हेवा खुंटलासे ।।३।।

चोखा म्हणे आता पुरे चाळवण । आमुचे कारण जाणो आम्ही ।।४।।

।२९।

असे करणे होते तुला । तरी का जन्म दिला मला ।।१।।

जन्म देवोनी सांडिले । का हो मन निष्ठूर केले ।।२।।

कोठे गेला माझे वेळी । केले कोणाचे सांभाळी ।।३।।

चोखा म्हणे देवा । नका मोकलू केशवा ।।४।।

।३०।

माझा मी विचार केला असे मना । चालवण नारायणा पुरे तुमचे ।।१।।

तुम्हावरी भार घालीतसे ओझे । हेची मी माझे जाणतसे ।।२।।

वाउगे बोलावे दिसे फलकट । नाही बळकट वर्म अंगी ।।३।।

चोखा म्हणे सुखे बैसेन धरणा । तुमच्या थोरपणा येईल लाज ।।४।।

**।३१।**

धाव घाली विठू आता चालू नको मंद ।

बडवे मज मारिती ऐसा काही तरी अपराध ।।१।।

विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला ।

शिव्या देती महारा म्हणती देव बाटविला ।।२।।

अहो जी महाराज तुमचे द्वारीचा कुतरा ।

नका जी मोकलू चक्रपाणी जिमेदारा ।।३।।

जोडोनिया कर चोखा विनविती देवा ।

बोलिलो उत्तरे परि राग नसावा ।।४।।

।३२।

जन्मोजन्मीचे तुम्ही सांगाती । काहो मज घातिले भ्रान्ती ।।
नाही कोठे सुख विश्रान्ती । पंढरी वाचोनि सर्वथा ।।१।।
विठोबा का न कळे तुम्हा । सर्व जगाचा तू आत्मा ।।
पुराण पुरुष परमात्मा । आम्हा दीना उपेक्षिसी ।।२।।
पहा न्याय नाही तुमचे घरी । एका दुःख एक राज्य करी ।।
ऐसी नीत नव्हे बरी । साजे थोरी थोरपणे ।।३।।
चोखा म्हणे नवलाव । आम्हा न कळे ठाव भाव ।।
तुमचा कैसा घाव डाव । काहीच तो विठोबा ।।४।।

**।३३।**

काहो केशिराजा दुजे पै धरिता । हे तो आश्चर्यता वाटे मज ।।१।।

एकासी आसन एकासी वसन । एक तेचि नग्न फिरताती ।।२।।

एकासी कदान्न एकासी मिष्टान्न । एका न मिळे कोरान्न मागताची ।।३।।

एकासी वैभव राज्याची पदवी । एक गावोगावी भीक मागे ।।४।।

हाचि न्याय तुमचे दिसतोकी घरी । चोखा म्हणे हरी कर्म माझे ।।५।।

**।३४।**

एकांति बैसोनि करी गुजगोष्टी । धरोनि हनुवटी बुझावित ।।१।।

नको बा मानू संसाराचा शीण । तुज एक खूण सांगतो मी ।।२।।

होणार ते होय जाणार ते जाय । सुख दुःख पाहे कर्माधीन ।।३।।

देव म्हणे चोख्या मानू नको शीण । तुज माझी आण भक्तराया ।।४।।

।३५।

मुळीचा सोवळा कोठे तो ओवळा । पाहता पाहणे डोळा जयापरी ।।

सोवळ्याचे ठायी सोवळा आहे । वोवळ्याच्या ठायी वोवळा का न राहे?।।

चोखा म्हणे देव दोहीच्या वेगळा । तोचि म्या देखिला दृष्टीभरी ।।

**।३६।**

षड्रस पक्वाने विस्तारिले ताट । जेवू एकवट चोखा म्हणे ।।

**।३७।**

पंचही भूतांचा एकचि विटाळ । अवघाचि मेळ जगीनांदे ।।१।।

तेथे तो सोवळा वोवळा तो कोण । विटाळाचे कारण देह मूळ ।।२।।

आदिअंती अवघा विटाळ संचला । सोवळा तो झाला कोण न कळे ।।३।।

चोखा म्हणे मज नवल वाटले । विटाळ परते आहे कोण ।।४।।

।३८।

वेदाशी विटाळ शास्त्राशी विटाळ । पुराणे अमंगळ विटाळाची ।।१।।

जीवाशी विटाळ शिवाशी विटाळ । काया अमंगळ विटाळाची ।।२।।

ब्रह्मीया विटाळ विष्णूशी विटाळ । शंकरा विटाळ अमंगळ ।।३।।

जन्मता विटाळ मरता विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदि अंती ।।४।।

**।३९।**

काळाचा विटाळ जीवाशिवा अंगी । बांधलासे जगी दृढ गाठी ।।१।।

विटाळी विटाळ चवदाही भुवने । स्थावर जंगम व्यापुनी विटाळची ।।२।।

सुखाशी विटाळ दुःखाशी विटाळ । विटाळी विटाळ वाढलासे ।।३।।

# आमची संग्राह्य व उपयुक्त प्रकाशने व ई-बुक्स

विटाळाचे अंगी विटाळाचे फळ । चोखा तो निर्मळ नाम गाय ।।४।।




सप्तर्षी प्रकाशन

सप्तर्षी असोसिएट्स ॲण्ड पब्लिकेशन्स
गट नं. ८४/२, घुले नगर,
दामाजी कॉलेज पाठीमागे,
मंगळवेढा जि. सोलापूर -४१३ ३०५
email: saptarsheeprakashan@gmail.com
saptarsheeprakashan@rediffmail.com

ई-बुकसाठी लींक www.bookganga.com/saptarsheeprakashan